
# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सहावी













# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

मंजुरी क्रमांक : मराशैसंप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६/१६७३ दिनांक ६.४.२०१६

# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता सहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

ORNJSJ

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१६
पुनर्मुद्रण : नोव्हेंबर २०२०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती :**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
ॲड. विक्रम एडके, सदस्य
डॉ. अभिराम दीक्षित, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती :**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट :**

श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
डॉ. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
श्री. विक्रम अडसूळ
सौ. रूपाली गिरकर
सौ. मिनाक्षी उपाध्याय
सौ. कांचन केतकर
सौ. शिवकन्या पटवे
डॉ. अनिल सिंगारे
डॉ. रावसाहेब शेळके
श्री. मरीबा चंदनशिवे
श्री. संतोष शिंदे
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
श्री. शेखर पाटील
श्री. संजय मेहता
श्री. रामदास ठाकर

**संयोजक :**

**श्री. मोगल जाधव**
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
**श्रीमती वर्षा सरोदे**
विषय साहाय्यक, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**लेखिका :**
डॉ. शुभांगना अत्रे, प्रा. साधना कुलकर्णी

**मुखपृष्ठ व सजावट :**
प्रा. दिलीप कदम, श्री. रवींद्र मोकाटे

**नकाशाकार :**
श्री. रविकिरण जाधव

**निर्मिती :**

**श्री.सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी

**श्री. शशांक कणिकदळे,**
सहायक निर्मिती अधिकारी

**अक्षरजुळणी :**
मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :**
७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :**
N/PB/2021-22/15,000

**मुद्रक :**
MOHAK PRINTERS , PUNE

**प्रकाशक :**
**श्री. विवेक उत्तम गोसावी,**
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

**‘राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५’** आणि **‘बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम -२००९’** अनुसार महाराष्ट्र राज्यात **‘प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२’** तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमाची कार्यवाही २०१३-२०१४ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमात इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचा समावेश ‘परिसर अभ्यास भाग-१’ व ‘परिसर अभ्यास भाग-२’ मध्ये करण्यात आला आहे. इयत्ता सहावीपासून पुढील अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. यापूर्वी या विषयांसाठी दोन स्वतंत्र पाठ्यपुस्तके होती. आता या दोन्ही विषयांचा समावेश या मोठ्या आकाराच्या एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर विद्यार्थ्यांनी नेमक्या कोणत्या क्षमता प्राप्त कराव्यात हे अध्ययन-अध्यापन करताना स्पष्ट हवे. त्यासाठी या पाठ्यपुस्तकात इतिहास व नागरिकशास्त्र विभागांच्या सुरुवातीला त्या त्या विषयांच्या अपेक्षित क्षमता नमूद केल्या आहेत. या क्षमतांच्या अनुषंगाने पाठ्यपुस्तकातील आशयाची नावीन्यपूर्ण मांडणी करण्यात आली आहे.

इतिहासाच्या भागात ‘प्राचीन भारताचा इतिहास’ दिलेला आहे. त्यातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी तसेच याद्वारे त्यांची सामाजिक एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी हा उद्देश आहे. हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे दूरवरच्या देशांशी प्रस्थापित झालेले व्यापारी संबंध प्राचीन भारताच्या समृद्धीच्या मुळाशी होते. हे व्यापारी संबंध विश्वबंधुत्व आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य या गोष्टींशिवाय शक्य होत नाहीत यावर भर दिलेला आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात ‘स्थानिक शासन संस्था’ याविषयी माहिती घेत असताना विकासाच्या योजनांमध्ये स्थानिक जनतेचा सहभाग, महिलांच्या सहभागाचा आणि त्यांच्या सहभागातून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख केलेला आहे. आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियमांनुसार चालतो हे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत सांगितले आहे. पाठांत चौकटींत दिलेली माहिती विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक करू शकेल. शिक्षकांसाठी वेगळ्या सूचना दिल्या आहेत. अध्यापन जास्तीत जास्त कृतिप्रधान व्हावे, यासाठी उपक्रम देण्यात आले आहेत.

पाठ्यपुस्तक जास्तीतजास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले. मंडळाची इतिहास विषय समिती व नागरिकशास्त्र विषय समिती, अभ्यासगट सदस्य, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(चं.रा.बोरकर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : ८ एप्रिल २०१६, गुढी पाडवा
भारतीय सौर : १९ चैत्र, १९३८

## – शिक्षकांसाठी –

- प्राचीन भारताचा इतिहास विद्यार्थ्यांना शिकवण्याचे प्रयोजन विद्यार्थ्यांना आपली संस्कृती आणि परंपरा यांची सर्वांगीण माहिती मिळावी आणि त्याद्‌वारे त्यांची सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसंबंधीची जाणीव वाढीस लागावी, हे आहे. शिक्षकांनी प्राचीन भारताचा इतिहास हा विषय शिकवताना हे प्रयोजन लक्षात घेऊन शिकवण्याच्या पद्‌धतीचे नियोजन करावे.
- रोजच्या जीवनात प्रत्ययाला येणाऱ्या अनेक सांस्कृतिक प्रथा-परंपरांबद्‌दल विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात. ते प्रश्न काय असतील हे स्वानुभवाच्या आधारे शिक्षकांनाही माहीत असणे अपेक्षित असते. असे प्रश्न विद्यार्थ्यांनी निर्भय होऊन विचारावेत, या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.
- आपल्या सांस्कृतिक वारशाबद्‌दलची जाणीव प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासातून निर्माण होण्यासाठी विविध प्रकारच्या प्राचीन वस्तू, नाणी, प्राचीन स्थापत्याचे नमुने यांबद्‌दलची अधिकाधिक माहिती मिळवण्याची साधने कोणती, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करावे. पाठ्यपुस्तकातील माहितीव्यतिरिक्त अधिक माहिती संकलित करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.
- हडप्पा संस्कृतीच्या काळापासूनच भारताचे दूरवरच्या देशांशी प्रस्थापित झालेले व्यापारी संबंध प्राचीन भारताच्या समृद्‌धीच्या मुळाशी होते, हे लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप विद्यार्थ्यांना थोडक्यात समजावून सांगावे. अशा प्रकारचा व्यापार विश्वबंधुत्व आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य या गोष्टींशिवाय शक्य होत नाही, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे.
- रामायण आणि महाभारत ही महाकाव्ये आग्नेय आशियातील इंडोनेशिया, कंबोडिया या देशांमध्ये नृत्यनाट्याच्या स्वरूपात सादर करण्याची परंपरा आजतागायत टिकून आहे. तेथील प्राचीन शिल्पांमध्येही त्यांतील कथांचा समावेश केलेला आढळतो. त्यासंबंधीची अधिक माहिती मिळवून ती वर्गात सादर करता येईल, यासाठी विद्यार्थ्यांना प्रकल्प द्यावेत.
- ‘पाणिनि’, ‘स्मृति’ या शब्दांसारखे ऱ्हस्व ‘इ’कारान्त शब्द आणि ‘सिंधु’ या शब्दासारखे ऱ्हस्व ‘उ’कारान्त शब्द हे संस्कृतमधून मराठीमध्ये आलेले तत्सम शब्द आहेत. अशा प्रकारचे शब्द विशेषनाम वगैरे स्वरूपात आले असतील, तर पुस्तकात त्यांचा जेव्हा पहिल्यांदा उल्लेख आला असेल, तेव्हा ते शब्द अनुक्रमे ऱ्हस्व इकारान्त व ऱ्हस्व उकारान्त ठेवले आहेत. या शब्दांचे मूळ रूप कळावे म्हणून असे करण्यात आले आहे, परंतु अशा प्रकारच्या शब्दांचा पुस्तकात जेव्हा नंतर उल्लेख आला असेल, तेव्हा ते शब्द मराठी प्रमाणलेखनाच्या नियमानुसार दीर्घ ‘ई’कारान्त व दीर्घ ‘ऊ’कारान्त लिहिले आहेत. असे तत्सम शब्द समासात पूर्वपद म्हणून आले असतील, तर मात्र प्रमाणलेखनाच्या नियमानुसार त्यांचे मूळ रूप सर्वत्र कायम ठेवले आहे.
- नागरिकशास्त्र विषयाची सुरुवात करण्यापूर्वी आपल्या देशातील शासनरचना स्पष्ट करावी. संघशासन, घटक राज्यशासन आणि स्थानिक शासन यांचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करावे.
- स्थानिक कारभाराविषयी राज्यशासनाचे स्वतंत्र कायदे आहेत. विद्यार्थ्यांना त्या कायद्यांची विस्तृत माहिती देणे अपेक्षित नाही, परंतु आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांना अनुसरून चालतो हे त्यांना आवर्जून सांगावे. कायद्याचे अधिराज्य असल्याचे फायदे त्यांना वेगवेगळ्या उदाहरणांतून दाखवून द्यावेत.
- त्र्याहत्तराव्या आणि चौऱ्याहत्तराव्या संविधान दुरुस्तीचे इथे त्रोटक उल्लेख आहेत. या संविधान दुरुस्त्यांमुळे स्थानिक शासन संस्थांचे सबलीकरण झाले आहे, ही बाब लक्षात घेऊन स्थानिक शासन संस्थांमध्ये झालेले बदल विद्यार्थ्यांना सांगावेत.
- स्थानिक शासन संस्थांमधील महिलांच्या सहभागाचा आणि त्यांच्या सहभागातून झालेल्या बदलांचा आवर्जून उल्लेख करावा.
- ब्रिटिश राजवटीत ‘स्थानिक स्वराज्य संस्था’ असे स्थानिक शासनाला म्हटले जात असे. स्वातंत्र्यानंतर सर्वच पातळ्यांवर स्वराज्य असल्याने आता ‘स्थानिक शासन संस्था’ असे म्हटले जाते.

# प्राचीन भारताचा इतिहास

## अनुक्रमणिका


| पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. भारतीय उपखंड आणि इतिहास | १ |
| २. इतिहासाची साधने | ६ |
| ३. हडप्पा संस्कृती | १० |
| ४. वैदिक संस्कृती | १५ |
| ५. प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह | २० |
| ६. जनपदे आणि महाजनपदे | २६ |
| ७. मौर्यकालीन भारत | ३० |
| ८. मौर्य साम्राज्यानंतरची राज्ये | ३६ |
| ९. दक्षिण भारतातील प्राचीन राज्ये | ४२ |
| १०. प्राचीन भारत : सांस्कृतिक | ४८ |
| ११. प्राचीन भारत आणि जग | ५४ |



**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2016. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

## अध्ययन निष्पत्ती

| सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये / वैयक्तिकरीत्या अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• इतिहासाची घडण आणि भौगोलिक वैशिष्ट्ये याविषयी माहिती करून घेणे.<br>• चित्रे, विविध प्रकारच्या इतिहासाच्या साधनांची रेखाटने यांचे वाचन, विश्लेषण, त्यांवर चर्चा करून इतिहासतज्ज्ञांनी भारताच्या प्राचीन इतिहासाची पुनर्बांधणी कशाप्रकारे केली असेल याचा अर्थ लावणे.<br>• नकाशाविषयी कृती : महत्त्वाची स्थाने शोधणे, शिकारी व अन्न गोळा करणाऱ्यांची स्थाने, अन्न उत्पादक, हडप्पा संस्कृती, जनपदे, महाजनपदे, साम्राज्ये, बुद्ध आणि महावीर यांच्या जीवनात घडलेल्या घटनांशी संबंधित ठिकाणे, भारताबाहेर असलेली कला आणि स्थापत्यशास्त्रीय केंद्रे आणि त्यांचा भारताशी असलेला संबंध.<br>• महाकाव्ये, रामायण, महाभारत, सिलप्पधिकरम, मणीमेखलाई किंवा कालिदासाचे महत्त्वाचे साहित्य यांचा शोध घेणे.<br>• चर्चा करणे : बौद्ध व जैन धर्मांतील तत्त्वे आणि इतर विचारप्रवाह यांच्या मूलभूत संकल्पना व मध्यवर्ती मूल्ये – त्यांच्या शिकवणुकीची आजच्या काळातील समर्पकता – प्राचीन भारतातील कला आणि स्थापत्यशास्त्राचा अभ्यास, भारताचे संस्कृती आणि विज्ञान क्षेत्रांतील योगदान.<br>• भूमिका पालन : अनेक ऐतिहासिक मध्यवर्ती कल्पनांवर आधारित. उदा., कलिंग युद्धानंतर सम्राट अशोकमध्ये झालेला बदल. त्या काळातील लिखित साधनांमध्ये अंतर्भूत एखाद्या विषयावर आधारित.<br>• प्रकल्प पद्धती : राज्यांची उत्क्रांती, गण आणि संघ यांची कार्यपद्धती – विविध राज्यांचे, घराण्यांचे योगदान, भारताचा भारताबाहेरील क्षेत्रांशी असलेला संपर्क आणि या संपर्काचा झालेला विशेष परिणाम या प्रकल्पावर आधारित वर्गचर्चा.<br>• वस्तुसंग्रहालयास भेट : आद्य मानवी वसाहतींचे भौतिक अवशेष पाहण्यासाठी – हडप्पाकालीन, त्यांच्या संस्कृतींमधील सातत्य आणि परिवर्तन यांविषयी चर्चा करणे. | **अध्ययनार्थी**<br>06.73H.01 इतिहास आणि भूगोल यांचा सहसंबंध ओळखतात.<br>06.73H.02 इतिहासाची विविध साधने ओळखतात आणि त्यांचा या काळातील इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी उपयोग स्पष्ट करतात.<br>06.73H.03 भारताच्या नकाशावर महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांचे स्थान दर्शवतात.<br>06.73H.04 महत्त्वाची राज्ये, राजघराणी यांचे लक्षणीय योगदान स्पष्ट करतात. उदा., अशोकाचे शिलालेख, गुप्तकालीन नाणी, पल्लवांची रथमंदिरे, इत्यादी.<br>06.73H.05 प्राचीन काळातील व्यापक घडामोडी स्पष्ट करतात. उदा., शिकारी व अन्न गोळा करणारे हा टप्पा ते शेतीची सुरुवात. सिंधु संस्कृतीतील पहिली नगरे इत्यादी. एका ठिकाणच्या घडामोडीचा दुसऱ्या ठिकाणाशी संबंध जोडतात.<br>06.73H.06 त्याकाळच्या लिखित साधनांमध्ये नमूद केलेल्या बाबी, घटना, व्यक्ती यांचे वर्णन करतात.<br>06.73H.07 भारताचा भारताबाहेरील क्षेत्राशी आलेल्या संपर्काचा धर्म, कला, स्थापत्यशास्त्र इत्यादी क्षेत्रांवर झालेला परिणाम स्पष्ट करतात.<br>06.73H.08 भारताचे सांस्कृतिक व वैज्ञानिक क्षेत्रांतील योगदान स्पष्ट करतात. उदा. खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणित, धातुशास्त्र इत्यादी.<br>06.73H.09 विविध ऐतिहासिक घडामोडींच्या संबंधित माहितीचे संश्लेषण करतात.<br>06.73H.10 प्राचीन काळातील विविध धर्म आणि विचारपद्धती यांची मूलभूत तत्त्वे आणि मूल्ये यांचे विश्लेषण करतात.<br>06.73H.11 मानवता आणि धर्मनिरपेक्षता हा सर्वश्रेष्ठ विचार आहे हे स्पष्ट करतात.<br>06.73H.12 वैचारिक व सांस्कृतिक आदान-प्रदानाने मानवाचे ज्ञान अधिक समृद्ध होते हे समजून घेतात. |